**वादी तर्फे उर्वरीत उलटतपास – श्री. ए. एस. फराकटे वकील.**

**३७.** माझे व प्रतिवादी क्र.५ ते ८ यांची लग्ने झालेली असून आम्ही आमच्या सासरी राहत आहोत. हे म्हणणे खरे नाही की, मी व प्रतिवादी क्र.५ ते ८ गंगूबाईच्या अनौरस मुली आहोत. हे म्हणणे खरे नाही की, मयत प्रतिवादी क्र.१ ने त्याच्या लेखी कैफियतीमध्ये आमच्या जन्म, लग्न आणि शिक्षणाबाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, नि.दि.दा. क्र.१११/२००० गुणदोषावरती निकाली निघालेला नाही. मला सदर दाव्यात काय आदेश झाला आहे याची माहिती नाही.

**३८.** मला सदर दाव्याच्या आदेशावरुन झालेला फेरफार क्र.१३९५ ची वादींना नोटीस मिळाल्याबाबतची माहिती नाही. मी १३९५ चा फेरफार वाचून पाहिलेला आहे. मला सदर नोंद कोणत्या साली घेण्यात आली याबाबत सांगता येणार नाही. गट क्र.४९९ मध्ये साडेतीन एकर जमीन आहे. प्रतिवादी क्र.२ याने त्यातील जमीन सन २००४ साली विक्री केली आहे. मी त्या विक्रीपत्राला हजर नव्हते. त्या खरेदीची रक्कम प्रकाशने घेतली होती.

प्रश्न – तुम्ही कशाच्या आधारे प्रकाशने पैसे घेतले असे सांगत आहात ?

उत्तर – जमीन ज्याने विकली असते तोच पैसे घेत असतो या तर्कावरुन मी प्रकाशने पैसे घेतल्याचे सांगत आहे.

**३९.** मी प्रकाश व खरेदीदाराला जमिनीची रक्कम स्विकारताना पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्राच्या पान क्र.५ वरील परिच्छेद क्र.५ मध्ये वाटप झाल्याचे चुकीचे नमूद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकती या वादी व प्रतिवादी क्र.१ आणि २ यांच्या एकत्र कुटुंबाच्या मिळकती आहेत.

**४०.** हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ चे वडिल वारल्यानंतर तो अज्ञान असल्यामुळे दावा मिळकती त्याची आई धोंडूबाई तेजमच्या नावे आल्या होत्या. बाळकू तेजमच्या मृत्यूवेळी प्रतिवादी क्र.१ अज्ञान व लहान होता. दावा मिळकत गट क्र.१५३, १४२ आणि १३२ या १९५० पासून नारायण सामंत यांच्या मालकीच्या व तेजम यांच्या घराण्यात कूळ म्हणून होत्या. माझ्याकडे सदर मिळकती सन १९५० साली नारायण

सामंतने तेजम यांना कूळाने लागण केल्याचा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे सदर मिळकती कधीपासून कूळाने लागण झाल्या याबाबतचा पुरावा नसल्यामुळे मला सांगता येत नाही. सदर मिळकती कूळकायद्याने तेजम परिवाराकडे आल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमिनी पुर्वीपासून संरक्षित कूळाच्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, ज्ञानोबाच्या हयातीपर्यंत सगळया कूळहक्काच्या जमिनी त्याच्या परिवाराकडे वहिवाटीसाठी होत्या.

**४१.** गट क्र.३६२/२ ही शंकर रंगू रानडे यांच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन पुर्वीपासून तेजम घराण्याकडे कसण्यासाठी होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकत मयत प्रतिवादी क्र.१ च्या नावे खरेदी झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकत मयत प्रतिवादी क्र.१ ला वारसाहक्काने आली होती. माझ्याकडे सदर मिळकत मयत प्रतिवादी क्र.१ ने धोंडिबा लक्ष्मण तेजम यांच्याकडून खरेदी घेतल्याचा कागदोपत्री पुरावा आहे. मला ती कोणत्या साली खरेदी झाली याबाबत सांगता येणार नाही. मी सदर खरेदी बाबतची कागदपत्रे एक महिन्यामध्ये सादर करु शकते.

**४२**. माझ्याकडे विठू तेजमची वंशावळ दाखवणारा कागदोपत्री पुरावा नाही. माझ्याकडे बाळू, लक्ष्मण, रामा, संतू आणि गणू एकमेकांचे भाऊ असल्याचा दाखवणारा कागदोपत्री पुरावा नाही. माझ्याकडे बाळू व्यतिरिक्त इतरांचे मृत्यूदाखले नाहीत. विठूचा मुलगा बाळू म्हणजे बाळकू असून तो १९४४ साली मयत झाला आहे. धोंडूबाई त्याची पत्नी असून ज्ञानोबा त्यांचा मुलगा आहे.

**४३**. हे म्हणणे खरे नाही की, ग्रामपंचायत मिळकत क्र.१०/१, ८/१/ब, ११/१, ११/२ आणि ११/३ या बाळकू पासून पुढे चालत आलेल्या आहेत. माझ्याकडे सदर घर मिळकती मयत प्रतिवादी क्र.१ ने विकत घेतल्याचे तसेच हस्तांतर झाल्याचे दाखवणारा कागदोपत्री पुरावा नाही. माझ्याकडे सदर मिळकती मयत प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.११ ते १५ यांना दिल्याचा कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकती वादी आणि प्रतिवादी क्र.१ व २ यांच्या एकत्र कुटुंबाच्या होत्या. मला दावा मिळकत १/क बाबत माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर ट्रॅक्टर व ट्रॉल्या

मयत प्रतिवादी क्र.१ च्या नावे आहेत. मला सदर ट्रॅक्टर व ट्रॉल्या प्रतिवादी क्र.१ च्या परिवारात कधी आल्या याबाबत माहिती नाहीत. मी त्याबाबतचा कागदोपत्री पुरावा पाहिलेला नाही. माझा त्यावेळी जन्म झालेला नसल्यामुळे मला त्यांच्या मालकीबाबत माहिती नाही. मी आजपर्यंत सदर वाहनांची कागदपत्रे पाहिलेली नाहीत. मला दावा दाखल करतेवेळी सदर वाहने मयत प्रतिवादी क्र.१ च्या नावे असल्याची माहिती नाही.

**४४**. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.५०३ चा पुर्वीचा सर्वे क्र.२३१ होता. त्यातील ०.८३ आर मिळकत ही दावा मिळकत आहे. तिच्या दाव्यात दिलेल्या चतुःसिमा बरोबर आहेत. मला गट क्र.४९२ ला पुर्वीचा सर्वे क्र.२०७ असल्याची माहिती नाही. मला तिचे क्षेत्र माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.५०३ व ४९२ ची जमीन मयत प्रतिवादी क्र.१ कडे वारसा हक्काने आली आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकती बाळकूच्या मृत्यूवेळी प्रतिवादी क्र.१ अज्ञान असल्यामुळे त्याची आई धोंडूबाईच्या नावे लागल्या होत्या.

DISTRICT COURT MAHARASHTRA

**४५.** हे म्हणणे खरे नाही की, दावा घर मिळकत क्र.११/२ व ११/३ शी प्रतिवादी क्र.११ ते १५ यांचा संबंध नाही. मला प्रतिवादी क्र.११ ते १५ यांना गट क्र.४९९, ५०० व ४९२ सोबत संबंध नसल्याची माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, सर्व दावा मिळकती या वादी व मयत प्रतिवादी क्र.१ च्या एकत्रीत कुटुंबाच्या मिळकती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर दाव्यात प्रतिवादी क्र.११ ते १६ यांना सदर दाव्यात सहभागी करायला लावले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादींना त्यांचा हक्क मिळू नये यासाठी मी प्रतिवादी क्र.११ ते १६ यांना सदर दाव्यात समाविष्ट केले आहे.

**४६**. मला प्रतिवादी क्र.९, १० व १६ यांचा गट क्र.४९२ व ५०३ मधील मिळकतींशी संबंध असल्याची माहिती नाही. मला मयत प्रतिवादी क्र.१ ने कोणतीही गरज नसताना सदर प्रतिवादींना दावा मिळकतीच्या विक्रीचे खोटे दस्त तयार केल्याची माहिती नाही. मला मयत प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.२ ला बळजबरीने स्वाक्ष–या करायला लावल्याची माहिती नाही.

**४७**. मला मी स्वतंत्र दिलेल्या लेखी कैफियतीबाबत माहिती नाही. साक्षीदार पुन्हा सांगते, तिला त्याबाबत माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मयत प्रतिवादी क्र.१ स्वतः न्यायालयात हजर राहून कामकाज पाहत होता. मयत प्रतिवादी क्र.१ ने सदर दाव्याचे कामकाज पाहण्यासाठी सन २००९ मध्ये दुस–याला वटमुखत्यारपत्र दिले होते. मला मयत प्रतिवादी क्र.१ ने सदर वटमुखत्यारपत्र सन २००९ मध्ये कोणत्या तारखेला, कोणत्या ठिकाणी व कोणाला करुन दिले होते याबाबत सांगता येणार नाही. माझ्याकडे त्या वटमुखत्यारपत्राची प्रत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मयत प्रतिवादी क्र.१ ने २००९ साली वटमुखत्यारपत्र दिल्याचे खोटे सांगत आहे. मला सन २००९ साली वटमुखत्यार व्यतिरिक्त मयत प्रतिवादी क्र.१ ने इतर कागद केल्याची माहिती नाही.

**४८**. मी मयत प्रतिवादी क्र.१ ने २००९ साली केलेल्या वटमुखत्यारपत्राला हजर नव्हते. मला २००९ साली मयत प्रतिवादी क्र.१ ने कसला कागद केला याबाबत आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी वादी व प्रतिवादी क्र.२ चा हक्क डावलण्यासाठी खोटा स्वतंत्र लेखी जबाब देऊन खोटा पुरावा देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ते ८ यांचा मयत प्रतिवादी क्र.१ च्या घराण्याशी व दावा मिळकतींशी कोणताही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ही मयत प्रतिवादी क्र.१ ची कधीही पत्नी नसून त्याच्या सोबत राहिलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझा व प्रतिवादी क्र.५ ते ८ यांचा मयत प्रतिवादी क्र.१ पासून जन्म झालेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व प्रतिवादी क्र.५ ते ८ या प्रतिवादी क्र.३ च्या अनौरस मुली आहोत. हे म्हणणे खरे नाही की, मी जाणीपूर्वक आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – ०१.०४.२०२५.

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.